सा. बीड गादर

नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा

संपादक : ज्ञानेश्वर लंगे

बीड- महाराष्ट्र | साप्ताहिक | वर्षे 1 ले | अंक 43 वा | बुधवार, दि. 16 ऑक्टोबर 2024 | टीसी- एमएएचएमआर/2023/52253 | पाने 4 | किंमत 2 रु |

BEED - MAHARASHTRA VICKELY | VOL 1 | issue 43 | Wednsday, 16 OCT 2024 | TC- MAHMAR/2023/52253 | PAGE 4 | Rs. 2 रु |







# महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीचा रणसंग्राम

## 20 नोव्हेंबरला मतदान 23 तारखेला निकाल...

**नवी दिल्ली वृत्तसंस्था**

महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या विधानसभा निवडणुकीचे बिगूल आज वाजले. महाराष्ट्रात एकाच टप्प्यात विधानसभेच्या २८८ जागांसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहे. शिंदे सरकारची मुदत संपून २५ नोव्हेंबरनंतर राज्यात नवे सरकार अस्तित्वात येणार आहे.

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्याआधीच राज्यातील सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याचे राजीव कुमार यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात एकूण ९ कोटी ६३ लाख मतदार आहेत. ४ कोटी ६६ लाख महिला तर ४ कोटी ९८ लाख पुरुष मतदार आहेत. १ लाख १८६ मतदान केंद्रांवर मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. लोकसभेच्या वेळी झालेल्या चुका टाळणार आम्ही काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा दौरा केला होता. राज्यात निवडणुकीची तयारी योग्य प्रकारे झाली की नाही याची माहिती आम्ही घेतली. लोकसभा निवडणुकीच्या वेळी झालेल्या चुका विधानसभा निवडणुकी दरम्यान टाळण्याचा आमचा पूर्णपणे प्रयत्न असेल, असे राजीव कुमार म्हणाले.

शिवसेना आणि राष्ट्रबादी या दोन पक्षांत फूट पडल्यानंतर होणारी ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालावर राजकारणातील अनेक गोष्टी अवलंबून असतील. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा थेट सामना असला तरी अनेक फॅक्टर महत्त्वाचे आणि गेमचेंजिंग ठरणार आहेत. महायुतीत भाजपसोबत एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी आहेत. तर महाविकास आघाडीत काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आहेत. याशिवाय छत्रपती संभाजीराजे यांची तिसरी आघाडी, बंचित बहुजन आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मनोज जरांगे पाटील यांचाही परिणाम जाणवणार आहे.

निवडणूक अधिसूचना : 22 ऑक्टोबर
उमेदवारी अर्ज प्रारंभ : 22 ऑक्टोबर
अर्ज भरण्याची तारीख : 29 ऑक्टोबर
अर्जाची छाननी : 30 ऑक्टोबर
अर्ज मागे : 4 नोव्हेंबर
मतदान : 20 नोव्हेंबर
मतमोजणी : 23 नोव्हेंबर

जिल्ह्यात बीडसह परळी, आष्टी, माजलगाव, केज आणि गेवराई, असे सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. या निवडणूक अनुषंगाने काही इच्छुक उमेदवार हे मागील सहा 3 महिन्यांपासूनच मतदारसंघात सक्रीय झाले आहेत. काही मतदारसंघात विद्यमान आमदारांच्या कामावर पक्ष आणि मतदारही नाराज आहेत. त्यामुळे लोक यावेळी बदल घडविण्याच्या तयारीत आहेत. हाच धागा पकडून आता नवनवीन चेहरे इच्छुक उतरणार असल्याचं दिसत आहे.

# कोजागिरी पौर्णिमा निमित्त आकाश शिंदे यांच्या गायनाचा कार्यक्रम आज वडवणीत

## माजलगाव मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग सोळंके यांची विशेष उपस्थिती



**वडवणी प्रतिनीधी**

वडवणी शहरात प्रथमच कोजागिरी पोर्णिमेच्या निमित्त उआज सायंकाळी सुप्रसिध्द गायक आकाश शिंदे यांचा सदाबहार गायनाचा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला माजलगांव विधानसभा मतदार संघाचे युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तरी या कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील भाविक- भक्तांनी हजारोंच्या संख्येनी उपस्थित रहावे असे आव्हान संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. वडवणी शहरातील गोपालचा राज गणेश मंडळाच्या ठिकाणी आज दि.१६ आँक्टोंबर २०२४ वार बुधवार रोजी सायं. ठिक ७ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजलगांव विधानसभा मतदार संघाचे युवा नेते जयसिंगभैय्या सोळंके तर विशेष उपस्थिती म्हणून वडवणी न.प. नगराध्यक्ष शेषेराव जगताप तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक सचिन सानप व राहुल घाडगे यांची उपस्थिती लाभणार आहे. तरी या कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील भाविक भक्तांनी प्रथमच होत असलेल्या या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येनी उपस्थितीत रहावे असे आव्हान संयोजक युवा उद्योजक राहुल वाघमोडे, दिलीप रोकडे, रवीबप्पा घाडगे, अजय खांडवे, विजय सवालके, जगन्नाथ घुमरे, गोपाल बुरसे, संतोष डोंगरे, वैभव सोळंके, अंकल वाघमोडे यांच्यासह गोपाळ गणेश मित्र मंडळने आव्हान केले आहे.





### कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी शंभर लिटर दूध

माऊली सिलेक्शनचा वतीने कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी जगदंबा माता नवरात्र उत्सवाला महाप्रसाद म्हणून गोपळनगर येथे शंभर लिटर दुधाचा प्रसादाचे आयोजन केले आहे. तरी भाविक भक्त माता-भगिनींनी दुधाचा प्रसादासाठी उपस्थित रहावे.

– **विनोद असलकर,** माऊली सिलेक्शनचा वडवणी



## माजलगावात सराफा दुकानातून हातचलाखीने 50 हजाराचे सोने लांबवले

**माजलगाव :** शहरातील बीड रोडवर असलेल्या देशमुख सराफ या दुकानातून दोन अज्ञात चोरट्यांनी हातचलाखी करून ५० हजार रुपयांचे सोने लांबवल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली, याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

- शहर पोलीस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या बीड रोडवरील व्यंकटेश कॉम्प्लेक्स मधील देशमुख सराफ या सोने-चांदीच्या दुकानात मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास अज्ञात दोन चोरट्यांनी प्रवेश केला व त्यांनी सोन्याचे दागिने बघण्याच्या बहाण्याने सोन्याचे कानातील दागिने दाखवत असताना हातचलाखी करून त्यातील सात ग्रॅमच्या दोन कानातले एका चोरट्याने अलगद आपल्या खिशात टाकले त्यानंतर सराफाला बोलण्याच्या नादात गुंगवून हे चोरटे पसार झाले. सदरील बॉक्सचे वजन कमी भरल्याने शंका आल्याने सराफ दुकानदार सुधाकर देशमुख यांनी तात्काळ त्या बॉक्सचे वजन केले असता ते कमी भरल्याने त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. बाहेर येऊन पाहू पर्यन्त चोरटे आपल्या साथीदारांसह दोन मोटर सायकलवर पसार झाले होते.या घटनेनंतर त्यांनी तात्काळ शहर पोलीस स्टेशनला सर्व प्रकार सांगून व घटनेचे व्हिडिओ पोलिसांना सुपूर्द केले व तक्रार दाखल केली या प्रकरणी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार शिवाजी तळेकर हे तपास करत आहेत या घटनेमुळे सराफा बाजारात खळबळ उडाली आहे.



## माजलगावात गुटख्यावर कारवाई : एक लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**माजलगाव प्रतिनिधी**

अंबाजोगाई अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या पथकाने माजलगाव तालुक्यातील सादोळा येथे एका दुकानात छापा टाकून तेथून एक लाख वीस हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला. याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

-अंबाजोगाई येथील अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांना मंगळवारी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाल्याने त्यांच्या पथकाने माजलगाव ग्रामीण हद्दीमध्ये मौजे सादोळा या ठिकाणी पंचांना सोबत घेऊन अधिकारी व आमदार यांनी सादोळा येथे राजू गोपाळराव साखरे यांच्या कन्फेशनरी दुकानात छापा टाकून खात्री केली असता त्याच्याकडे वेगवेगळ्या किमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा व सुगंधी तंबाखू त्याच्या ताब्यात मिळून आली. त्यानुसार दोन पंचा समक्ष पंचनामा करून व सदरचा १,२००००/- रुपये किमतीचा गुटख्याचा माल ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण येथे गुन्हा दाखल केला. सदरची कारवाई अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्रसिंग ठाकूर, संजय राठोड, सचिन सिद्धेश्वर, तानाजी तागड राऊत, बाबरे यांनी केली.

# भगवानगडाचे चतुर्थ महंत कृष्णा महाराज शास्त्री

## भगवानगडाचा अमृत महोत्सवामध्ये नवनियुक्त महंत कृष्णा महाराज शास्त्री यांना गादीचे हस्तांतर - डॉ.नामदेव महाराज शास्त्री





**भगवानगड प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती महंत गाव नामदेव शास्त्री यांनी एकनाथवाडी येथील श्री क्षेत्र निरंजन संस्थानचे महंत ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री यांची श्री क्षेत्र भगवानगडाचे चतुर्थ उत्तराधिकारी (महंत) पदी म्हणून निवड केली असून त्यांना सोमवार दि.१४ ऑक्टोबर या दिवशी एकनाथवाडी या ठिकाणाहून ग्रामस्थांनी सकाळी ८ वाजता रथामध्ये बसवून ढोल, ताशा, टाळ, मृदंग, हरी नामाचा जयघोष करत महिला भगिनी व पुरुष मंडळी हातामध्ये झेंडे, पताका घेऊन कृष्णा महाराज यांना भगवानगडावरती पोहोचवले. एकनाथवाडीपासून निघाल्यानंतर रस्त्यामधील मुंगसवाडे, श्रीपतवाडी, मालेवाडी, खरवंडी कासार, किर्तनवाडी या ठिकाणी कृष्णा महाराज शास्त्री यांचे भगवानगडाचे चतुर्थ महंत कृष्णा महाराज शास्त्री लोकांनी भव्य असे स्वागत केले.

रस्त्याने जिकडे तिकडे गर्दीच गर्दी होती. ठिकठिकाणी जेसीबीच्या साह्याने फुलाचा वर्षावही करण्यात आला. श्री संत भगवान बाबा की जय, नामदेव महाराज शास्त्री की जय अशा घोषणा देत सर्व भाविक मंडळी भगवान गडाकडे पायी वाटचाल करत होती. कृष्णा महाराज यांच्याविषयी सांगायचे म्हणजे त्यांचे मूळ गाव तेलंगणा असून ते १२ वर्षांपूर्वी भगवानगडावरती आले. ज्ञानेश्वरीचे संपूर्ण शिक्षण भगवानगडावरील ज्ञानेश्वरी विद्यापीठामध्ये झाले. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंतचे झालेले आहे. त्यांनी १२ वर्षे ज्ञानेश्वरीचे संपूर्ण शिक्षण डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्याकडून घेतले आहे.

# देवीच्या मंदिर परिसरात यात्रेचे आयोजन, कुस्त्यांच्या फडाचे आहे आकर्षण

## चिंचवणच्या जगदंबा नवरात्रोत्सवाची आज होणार सांगता, सासरवाशिणी येतात माहेरी

**प्रतिनिधी | वडवणी**

वडवणी तालुक्यातील चिंचवण येथील जगदंबा देवीच्या नवरात्रोत्सवाची सांगता आज बुधवारी (दि. १६) कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी होणार आहे. यानिमित्त देवी मंदिर परिसरात यात्रेचे आयोजन करण्यात आले असून यात्रेत कुस्त्याचा फड रंगणार आहे. चिंचवण गावातील लेकी प्रत्येक वर्षी कोजागरी पौर्णिमेला नवरात्रोत्सवाच्या सांगतेदिवशी देवीच्या दर्शनासाठी सासरहून माहेरी येतात.

चिंचवणची जगदंबा देवी हे पंचक्रोशीतील जागृत देवी आहे. चिंचवणचा रामायणातही उल्लेख असल्याचा दावा केला जातो. महीरावण राक्षसाने राम, लक्ष्मणाला ज्या गुहेत लपवून ठेवले होते त्या गुहेतून द्वारपाल मकरध्वज होता. बजरंगबली हनुमान व मकरध्वज यांच्यात घनघोर युद्ध झाले होते. रामायणातील मंकावती म्हणजे आजचे वडवणी तालुक्यातील चिंचवण होय. गावात आजही भुयार पाहायला मिळत असून गावात मंकावती देवीचे मंदिर अस्तित्वात आहे. गावात अनेक हेमाडपंती मंदिरे असून त्यातील एक जगदंबा देवीचे मंदिर आहे. हे मंदिरदेखील रामायणातीलच असावे, असे भाविक सांगतात. विविध जाती-धर्मातील लोक होतात सहभागी वडवणी तालुक्यातील चिंचवण येथील जगदंबा देवीचे पुरातन मंदिर व देवीची मूर्ती. मंदिराची रंगरंगोटी करून विद्युत रोषणाई चिंचवणची देवी ही तुळजाभवानीचे उपपीठ असून

नवरात्रोत्सवाच्या सुरूवातीला गावातील तरुण तुळजापूर जातात. जगदंबा देवी ही नवसाला पावणारी देवी असून जिल्ह्यातील अनेक ठिकाणाहून भाविक दर्शनासाठी येतात. देवीच्या यात्रेनिमित्त मंदिराची रंगरंगोटी करण्यात आली असून विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळला आहे. या यात्रा उत्सव व नवरात्रोत्सव सांगता समारोहास उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.



### पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष

चिंचवण येथे हेमाडपंती कोरीव दगड काम असलेले अनेक मंदिरे आहेत. या गावाला रामायणाचा इतिहास आहे. एवढे असूनही या गावाकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष आहे. पुरातत्व विभागाने या गावातील सर्व मंदिराची पाहणी करून त्या मंदिराचा जिर्णोद्धार व संवर्धन करणे आवश्यक आहे. मात्र, पुरातत्व विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी या मंदिराकडे देराकडे लक्ष लक्ष दिले नाही.

### अठरापगड जातीचे लोक येतात

आपापसाद मतभेद जरी असले तरी या ठिकाणी एकात्मतेचे प्रतीक असून चिंचवण गावात देवीच्या यात्रेमध्ये सर्व लोक एकत्र या गावात मुस्लिम, बौद्ध गुण्यागोविंदाने राहतात. राजकीय समाजाची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात आहे. या समाजाचे बांधवदेखील देवीच्या यात्रेमध्ये सहभागी होतात. त्यामुळे या ठिकाणी एकात्मता जपली जाते.


**विजयादशमीच्या शुभमूर्हतावर वांगी येथील नारायण बाबा संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. एकनाथ महाराज माने यांच्या शुभहस्ते संपन्न**

# यंदाच्या हंगामात 7 लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट पार करा

## प्रकाश दादा सोळंकेंचे कारखाना यंत्रणेला ताकदीने प्रयत्न करण्याचे आवाहन







**वडवणी प्रतिनीधी**

मराठवाड्याची भौगोलिक परिस्थीती पाहता पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठ्यडयात पावसाचे प्रमाण कमी होत असल्याने सातत्याने येथे दुष्काळाचा मुकाबला करावा लागला. असल्याचे आ. सोळंके यांनी सांगत आपल्या कारखान्याने यंदाच्या हंगामात ७.०० लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून हे उद्दिष्ट पार करण्यासाठी कारखन्याच्या सर्व यंत्रणांनी परिश्रम घेवून उद्दिष्ट पार पाडावे असे आवाहन साखर संघाचे उपाध्यक्ष आ. प्रकाश दादा सोळंके यांनी केले.

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या ३३ व्या बॉयलर अग्नीप्रदिपन समारंभ दि.१२ ऑक्टोंबर २०२४ रोजी विजयादशमीच्या शुभमूर्हताबर वांगी येथील नारायण बाबा संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. एकनाथ महाराज माने यांच्या शुभहस्ते करण्यात

आला. यावेळी महाराष्ट्र राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, व्हाईच चेअरमन जयसिंगभैय्या सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना आ. प्रकाशदादा सोळंके म्हणाले की, आपले कारखान्याचा नाव लौकीक असून कारखान्याने मागील हंगामात ऋच्झ पेक्षा जास्त दर दिलेला असून उस

उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याने केलेल्या नियोजना प्रमाणे उसाची लागवड करावी. जेणे करून उस उत्पादकांचा उस नियोजीत तोडणी प्रोग्राम प्रमाणे गाळपास आनने सोईचे होईल. मागील वर्षी केंद्र शासनाचे इथेनॉल बंदीच्या धोरणामुळे कारखाना आर्थीक अडचणीत आला. शासन ऋच्झ मध्ये वाढ करते मात्र साखर विक्रीचे दरात वाढ करीत नाही त्यामूळे

साखर उद्योग आर्थीक अडचणीत येतो. या आर्थीक संकटातून बाहेर येण्यासाठी आपणाला कमीत कमी ७.०० लाख मे.टन उस गाळपाचे उद्दिष्ठासह इथेनॉल, विज निर्मीतीचे उद्दिष्ठ ही पार पाडावे लागेल. त्यामूळे उस उत्पादक शेतक-यासाठी आपण उस कारखान्यास गाळपास देवून उद्दिष्ठ पुर्तीसाठी सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे जेष्ठ संचालक उपाध्यक्ष साखर संघ मुंबई

तथा मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके यांनी या केले. कार्यक्रमास सर्व संचालकासह परिसरातील विविध संस्थाचे पदाधिकारी, कारखान्याचे कार्यकारी संचालक आर. सी. बडगुजर यांच्यासह सर्व खातेप्रमुख, कर्मचारी, कामगार सर्व ठेकेदार व कार्यक्षेत्रातील सभासद, उस उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संचालक छगनराव जाधव यांनी केले.

> “ लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याने आपल्या गाळप क्षमते नुसार उसाचे गाळप या हंगामात करण्याचे काटेकोरपणे नियोजन केलेलं आहे.ऊस कमी असो,जास्त असो सलग ३२ वर्षे एकही हंगाम गाळप बंद न ठेवता,आपल्या अडचणी शेतकऱ्यांना न सांगता कारखाना सुरळीत सुरू आहे याचा आनंद आहे. कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धीचा प्रकाश पडावा हीच भावना आजवर उराशी बाळगली.तुम्हा सर्वांच्या विश्वासावर कारखाना तग धरून आहे हे यावेळी आवर्जून नमूद केले. हा गळीत हंगाम कसोटीचा आहे आजवर जे सहकार्य आपण सर्वांनी कारखान्यास केले तसेच पुढेही आपण करत राहावं ही विनंती.
> **– प्रकाश दादा सोळंके**, आमदार माजलगाव मतदारसंघ

# माजलगाव तहसीलवर मातंग समाज अधिकार मोर्चा धडकला

## समाजाचा विविध मागण्याचे निवेदन : अमोल शेरकर

**माजलगाव प्रतिनिधि**



माजलगाव मतदार संघातील मातंग समाजाच्या विविध मागण्यासाठी माजलगाव तहसील कार्यालयावर युवा नेते अमोल शेरकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो समाजबांधवाणी मोर्चा काढला.

सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करा, मातंग समाज हा अतिशय उपेक्षित असल्याने त्याचे वर्गीकरण करून त्याला न्याय मिळवून देण्यासंदर्भात शासनाकडून अ, ब, क, ड करण्यात यावे, महाराष्ट्रात अस्तित्वात असलेले लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाला कायमस्वरूपी चेअरमन देऊ रिक्त जागा भरा, ज्या लाभार्थ्यांनी आजपर्यंत कर्ज घेतले आहे त्यांचे कर्ज माफ करा, गायरान धारकांच्या ताब्यात असलेल्या जमिनी कायमस्वरूपी नावे करून द्या, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी तालुकास्तरावर वस्तीगृह निर्माण करून मुलांना मोफत शिक्षण द्या अशा विविध मागण्यासंदर्भात माजलगाव तहसील कार्यालय वर दि. ११ ऑक्टोबर रोजी मोर्चा कढण्यात आला. मोर्चात माजलगाव, वडवणी, धारूर या तिन्ही तालुक्यातील महिलांचा लक्षणीय सहभाग होता. मोर्चाचे नेतृत्व अमोल शेरकर यांनी केले. हा मोर्चा आंबेडकर चौक ते शिवाजी महाराज चौकातून छत्रपती संभाजी राजे चौक आणि नंतर तहसील कार्यालयावर धडकला. पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त देण्यात आला. निवेदन तहसीलदाराणा देण्यात आले.



# जिल्हाधिकारी पाठक यांनी 263 शस्त्र परवान्याचे अर्ज फेटाळले

## जिल्हाधिकाऱ्यांची ही कारवाई स्वागतार्ह : ॲड.अजित देशमुख

**बीड प्रतिनिधी :**



शस्त्र परवाना वैयक्तीक संरक्षणासाठी दिला जातो. तो नियम आहे. मात्र खरी गरज असेल तरच तो द्यावा, हाही नियम आहे. पोलिस अधीक्षक, बीड यांनी शिफारस केल्यानंतर देखील जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दोनशे बासष्ट शस्त्र परवाना मागणारे अर्ज प्रलंबित न ठेवता चक्क फेटाळून निकाली काढले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांची ही कारवाई स्वागतार्ह असल्याचे जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हंटले आहे.

एकीकडे पाठक यांनी ही कामगिरी केली आहे. तर दुसरीकडे तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या कालावधीत माजी सैनिक यांचे सोळा शस्त्र परवान्यांच्या नवीन नोंदी घेतल्या गेल्या. तर अर्जदार यांना निर्गमीत शस्त्र परवान्याची संख्या छत्तीस इतकी आहे. माहिती अधिकारातून ही माहिती उघड झाली आहे.

अपात्र आणि ज्यांच्यावर गुन्हेगारीचे आरोप आहेत, त्यांना सरकार आणि प्रशासनाच्या कृपेने शस्त्र परवाने दिले गेले. हे जनतेला पटत नव्हते. शिवाय शस्त्र लागते कशाला ? हाही प्रश्न आहे. त्यामुळे अविनाश पाठक यांची कारवाई चांगली आहे. अनेक ठिकाणी शस्त्राचा वापर हा दबावसाठी केला जातो. त्यातून दहशत माजविली जाते. गुंडगिरी यातून वाढत असल्याचे जनतेचे मत आहे. तर ज्यांचे काम चांगले असते, त्यांना स्व-संरक्षण भितीचे कधीच वाटत नाही. आता जिल्ह्यात तिस ते चाळीस शस्त्र परवाने मागणारे अर्ज आहेत. तेही जिल्हाधिकाऱ्यांनी फेटाळून लावावेत, असेही अँड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.

# वडवणीत जिवाजी महाले यांची जयंती उत्साहात साजरी

## पोलीस ठाण्याचे विलास खरात यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण

**वडवणी प्रतिनिधी:**

छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक शिवरत्न जिवाजी महाले यांची जयंती वडवणी येथे मोठ्या उत्साहात व थाटात फटाक्यांची आतिषबाजी करत साजरी करण्यात आली.

वडवणी नाभिक समाजाच्या वतीने जिवाजी महाले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली वडवणी येथील शिवाजी महाले चौकात वडवणी पोलीस ठाण्याचे विलास खरात यांच्या शुभहस्ते भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते जिवाजी महाले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पुजन करून भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माजी सभापती दिनकरराव आंधळे गुलाबराव राऊत, संजय आंधळे,राम सावंत, शिवाजी तौर,नगरसेवक भिमराव उजगरे, मुन्ना मुंडे, युवराज शिंदे,परमेश्वर राऊत, पत्रकार जानकीराम उजगरे,विलास झेंडे,संतराम राऊत,बबन बहिरे, संतोष बहिरे,विठ्ठल भैरे,आकाश सुरवसे,अतुल राऊत,अजय राऊत,विकास राऊत ,कृष्णा काळे, विलास झेंडे, संतोष काळे, भागवत शिंदे, पत्रकार जगदीश गोरे यांच्यासह वडवणी तालुक्यातील नाभिक समाज बांधवासह पत्रकार,वकिल,डॉक्टर,राजकीय,सामाजिक क्षेत्रातील सर्व मान्यवर उपस्थित होते.



# पिंपळा ग्रामस्थांचा वतीने शैलेश आंधळे यांच्या वतीने नागरी सत्कार संपन्न

## डोंगर पट्ट्यातील तरुण उच्चपदावर विराजमान झाल्याने लहान, थोर, पुरुष महिलाची उपस्थिती

**वडवणी प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील मौजे पिंपळारुई येथे ग्रामपंचायतच्या वतीने श्री शैलेश भिक्कम आंधळे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वर्ग १ पदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी गावातील लहान थोर पुरुष महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना केशवराव आंधळे सर यांनी शैलेश आंधळे व भिक्कम शेठ आंधळे यांचे कौतुक केले. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी किंवा कुळी कन्या पुत्र होते जे सात्विक तयाचा हरीक वाटे देवा याहीपेक्षा पुढे जाऊन मी असं म्हणेन पुत्र व्हावा ऐसा गुंडा त्याचा तीन्ही लोकी झेंडा अशा प्रकारच्या अभंगातून शुभेच्छा दिल्या. आपल्या मुलांनाही शैलेश होता आले पाहिजे त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत असे मनोगत व्यक्त करतांना सांगितले. याप्रसंगी गहिनीनाथ नगर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री ज्ञानोबा खाडे सर यांना केंद्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्या बद्दल सत्कार करण्यात आला. तसेच अदित्य श्रीराम आंधळे यांची पंचायत समिती मार्फत दूत म्हणून निवड करण्यात आली त्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी भिक्कम शेठ




आंधळे, डॉ. चोले खडकी, मुख्याध्यापक खटावकर सर, शिंदे सर, लिंगस्कर सर, पंधारे मॅडम, चंदनशिवे मॅडम, जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थी, उपसरपंच रावसाहेब आंधळे, संपत्तराव आंधळे, रामधन आंधळे, भाऊसाहेब महाराज, लक्ष्मण दादा आंधळे, परमेश्वर आंधळे, श्रीराम अप्पा, चंद्रशेन दादा, माजी सरपंच बंडू गवळी, सुमंत आप्पा, विनायक बप्पा आंधळे, गिण्यानदेव आण्णा आंधळे, वैजनाथ नाना, लक्ष्मण खाडे, रामामामा खाडे, शालेय समितीचे अध्यक्ष नशीर शेख, अर्जुन आबा, बनीमभाई शेख, महेबुब भाई, नागोराव भांगे, शिपाई शहादेव मुंडे, बाळासाहेब आंधळे रोजगार सेवक, सचिन आंधळे, श्रीमंत पाटील, महादूनाना, बाबासाहेब मुकादम, सुखदेव आबा, राजाभाऊ आंधळे ग्रा. सदस्य, बाबासाहेब भांगे, मधुबापू आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव गोविंद आंधळे, सुदामराव आंधळे, रावसाहेब आंधळे, उमेश आंधळे, वैभव आंधळे आदिसह गावकरी उपस्थित होते.



महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धेत राज्यात 44 व्या रँकने उत्तीर्ण झाल्याबद्दल पिंपळा ग्रामस्थांचा वतीने आनंदात गावाने ढोल, ताशाचा गजर करत फुलांचा वर्षाव केला. महिला भगिनीं, मातांनी औक्षण केलं. ज्येष्ठ वडीलधारी यांच्या हस्ते माझा जो भव्य सत्कार केला तो माझ्यासाठी प्रेरणादायी राहील.
– **शैलेश आंधळे**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग



शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी किंवा कुळी कन्या पुत्र होते जे सात्विक तयाचा हरीक वाटे देवा. याप्रमाणे अपल्या मुलाला भिकमशेट आंधळे यांनी चांगले संस्कार दिले आणि त्याच संस्काराने सातत्य ठेवत जिद्द आणि चिकाटीने शैलेश ने आई-वडिलांचे स्वप्न साकार केले. अशा प्रकारे आपल्या भागातील तरुणांनी अधिक अधिक मेहनत घेत यशाची शिखरे गाठावित.
– **केशव अप्पाराव आंधळे** सरपंच पिंपळा ( रुई )

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक –संपादक ज्ञानेश्वर आसाराम लंगे यांनी निर्मिती प्रिंटर्स, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ येथे छापुन मुख्य कार्यालय साप्ताहिक बीड गदर कार्यालय, मु.मामला, पो.पिंपरखेड, ता.वडवणी,जि.बीड – (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(※ या अंकातील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद–विवाद वडवणी न्यायालयांतर्गत) संपादक – ज्ञानेश्वर आसाराम लंगे

# आज जिल्हाधिकारी कार्यालयावर सरकारच्या चौदाव्याचा कार्यक्रम

## लेखी आश्वासन देऊन ही शासनाकडून अंमलबजावणी नाही ; शेतकऱ्यांची दिशाभुल थांबवा : कॉं. अजय बुरांडे





**वडवणी प्रतिनीधी**

एकीकडे शेतकऱ्यांनी, आयाबहिणींनी मागणी केलेली नसताना शेतकरी सन्मान, लाडकी बहीण या योजनांच्या नावावर हजार-दीडहजार रुपयांची भीक घालून दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचेच नाव पुढे करून हजारो कोटींचा विमा घोटाळा करणाऱ्या, शेतकऱ्यांना हमीभाव देण्यास चालढकल करणाऱ्या शेती आणि शेतकरी विरोधी सरकारचा दशक्रिया विधी तेलगाव येथे उरकून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १४ वा विधी करण्यात येणार असल्याची संतप्त भूमिका किसान सभेने व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांच्या जीवन-मरण्याच्या मागण्याला घेत किसान सभेकडून मागील ८ दिवसापासुन तेलगाव येथे धरणे आंदोलन सुरू असून शरमेची बाब म्हणजे शासनाने दिलेली लेखी आश्वासनाची अंमलबजावणी न झाल्याने हे धरणे आंदोलन सुरू असून अद्याप देखील मागणीची अंमलबजावणी न झाल्याने किसान सभेने हा निर्णय घेतल्याचे कॉं. अजय बुरांडे यांनी सांगीतले.

कोट्यवधी रुपयांचा घोटाळा संगनमताने करत पिकविमा कंपन्यांची झोळी भरायची अन् शेतकऱ्यांनी हमीभावासाठी कितीही संघर्ष केला करून तो मेला तरी त्याच्या कष्टाच्या सातत्याने येणारी नैसर्गिक आपत्ती आणि त्यात सरकारची उदासीन धोरण आणि भूमिका यामुळे शेतकऱ्यांच्या नरडीला फास आला आहे. आपल्या न्यायमागण्यासाठी शेतकऱ्यांनी कितीही धरणे आंदोलन, मोर्चे काढले तरी, ना पिकविमा द्यायचा! ना अनुदान द्यायचे! किसान सभेच्या लढ्यामुळे खरीप २०२३ चा पीक विमा केवळ १०३ कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आला मात्र अनेक शेतकऱ्यांना या पीक विम्या पासून चंबीत ठेवण्यात आले असून पीक विमा वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या याद्या मागितल्या तर टाळाटाळ करत बळीराजाची दिशाभूल करण्याचे काम शासनकर्त्याकडून सुरू असून कष्टकऱ्यांना घामाचे दान दिले तर ते स्वाभिमानी बनतील; म्हणून त्यांच्या कष्टांची रास्त किंमत मिळू द्यायची नाही आणि लाडक्या सन्मानाच्या नावावर तुकडे टाकून लाचारीने गोंडा घडायला भाग पाडायचं असे काम सत्ताधारी सरकार केवळ राजकिय स्वार्थापोटी धोरण राबवत आहे का? असा प्रश्न शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.९ ते १२ सप्टेंबरचे बीड येथील धरणे प्रसंगी ३० सप्टेंबर पर्यन्त मागण्यांची अंमलबजावणी आखिल भारतीय किसन सभा करू असे प्रशासनाने लेखी देऊन देखील एक ही मागण्यांची अंमलबजावणी काही प्रमाणात झाल्याने किसान सभेकडून तेलगाव या ठिकाणी शेतकऱ्यांना घेत दसऱ्यातील दहा दिवसाचे धरणे धरूनही गेंड्याची कातडी असलेल्या भ्रष्टाचारी आणि लबाड दहातोंडी शासनकर्त्यांचा दशक्रियाविधी आटपून दि. १३ ते १६ ऑक्टोबर दरम्यान बीड च्या दिशेने शेकडो शेतकरी पायी बीडच्या दिशेने रवाना होत दि. १६ ऑक्टोबर रोजी या उदासीन आणि शेतकरी विरोधी रावणाच्या रुपात असलेल्या सरकारचा चौदाव्याच्या कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पार पाडणार असल्याची माहिती यावेळी किसान सभेकडून जिल्हाध्यक्ष कॉ. एड. अजय बुरांडे, सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ. काशीराम सिरसाट, कॉ. दत्ता डाके, कॉ. जगदीश फरताडे, कॉ. विठ्ठल लगड आदींनी दिली.

### शेतकऱ्यांचा पायी मोर्चाचे वडवणीत स्वागत

किसान सभेच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या सरसकट विमा,विमा याद्या प्रकाशित करा व अनुदान आणि संपूर्ण कर्जमुक्ती या मागण्यांना घेऊन गेल्या अनेक दिवसांपासून संघर्ष चालू आहे. बीड येथील धरणे आंदोलनात दिलेले आश्वासन प्रशासनाने पूर्ण न केल्यामुळे दसऱ्यात दहा दिवस तेलगाव येथे धरणे आंदोलन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाच्या विरोधात किसान सभेने आक्रमक भूमिका घेत छत्रपती शिवाजी महाराज चौकात सरकारचा दहावा घालून चौदावा करण्यासाठी बीड कडे आगे कूच केली आहे. वडवणीकरांकडून प्रचंड उत्सहात स्वागत करून,विविध पक्ष आणि संघटनेने पाठिंबा देऊन आम्ही शेकडोच्या संख्येने आपल्यासोबत सहभागी होणार असं ठाम सांगितले. यावेळी किसान सभेचे जगदीश फरताडे, हनुमान शिंदे व लहू खारगे यांनी उत्साह पूर्वक शेती प्रश्नाची उकल करणारे मनोगत व्यक्त केले.

---

## विहिरीत पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू



**वडवणी प्रतिनीधी**

तालुक्यातील चिंचाळा येथील रहिवासी असलेले शेतकरी बळीराम चोरमले वय ७० हे आपल्या पत्नीसह शेतातच राहतात शनिवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास ते शेतातील घरून बाथरूम साठी जवळच्या शेतात गेले होते बाजूलाच असलेल्या विहिरीचा अंधारा मध्ये अंदाज न आल्याने विहिरीमध्ये पाय घसरून पडल्याने त्यांचा मृत्यू झाला बराच वेळ होऊनही बळीराम चोरमले हे शेतातील घरी परत न आल्याने त्यांचा इतरत्र शोध घेतला असता जवळच असलेल्या एका विहिरीमध्ये त्यांच्या पायातील चप्पल तरंगत असल्याने ते अंधारात विहिरीत पडले की काय असा अंदाज घरच्यांना आला गळा च्या साह्याने विहिरीमध्ये शोध घेतला असता बळीराम चोरमले यांची बॉडी मिळून आली यानंतर कुप्पा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पोस्टमार्टम करण्यात आले. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास चिंचाळा गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा सुन तीन मुली जावई नातरुंड असा परिवार आहे.

## शेतकरी संघटनेचे निष्ठावान पाईक कारभारी आण्णा पालकर याचे निधन

**माजलगाव प्रतिनीधी**

माजलगाव तालुक्यातील मालेगाव पारगाव येथील ज्येष्ठ नागरिक तथा शेतकरी संघटनेचे निष्ठावान पाईक कारभारी आण्णा पालकर यांचे वार रविवार रोजी वृद्धपण काळामुळे निधन झाले आहे. त्यांच्यावर रात्री अंत्यविधी करण्यात आला.

ज्या व्यक्तिमत्वाने निस्वार्थपणे शेतकरी संघटनेच्या शपथेशी व वारकरी संप्रदयाच्या विचारधारेशी प्रमाणिक राहून तत्वनिष्ठपणे आपल्या



शेवटच्या श्वासापर्यंत विचारधारेशी संलग्न राहून आपले सात्विक जीवन व्यतीत केले.

एखादा बिलाधारक भेटला तर त्याला मोठया मनाने जसे की त्यांना त्याच्या रुपात देवच भेटला आहे ऐवढा कमालीचा आपलेपणा प्रेम जिव्हाळाने अस्तिवाईकपणे चर्चा करुन आदराने खुशाली विचारायचे हे अनेकांनी खुपदा अनुभवले आहे. अशा रुबाबदार बाण्याच्या शिलेदार शेतकरी संघटनेचा अखंड बिलाधारक "डाण्या वाघ" निष्ठावान पाईकास भावपुर्ण श्रध्दांजली

## मौलाना आझाद महामंडळ सदस्यपदी शेख तय्यब

**बीड प्रतिनीधी**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या अशासकीय सदस्यपदी पत्रकार शेख तय्यब यांची नियुक्ती करण्यात आली. राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या शिफारशीवरून ही नियुक्ती करण्यात आली. महामंडळाची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. या निवडीबद्दल शेख तय्यब यांचे त्यांच्या समर्थकांनी स्वागत केले आहे. दरम्यान, तय्यब हे बीड विधानसभा निवडणुकीसाठी इच्छूक आहेत. त्यांच्या समर्थकांनी पक्षाकडे उमेदवारी मागितल्याची माहिती आहे.



---

# ऐश्वर्याताई सोळंके यांच्या दांडिया महोत्सव कार्यक्रमाला महिलांची अलोट गर्दी

## जयसिंग भैय्या सोळंके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा दांडिया महोत्सव उत्साहात

**धारूर प्रतिनिधि :**


शारदीय नवरात्र उत्सव निमित्त जयसिंग भैय्या सोळंके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने धारूर शहरातील बाजार मैदान येथे दि.०९ ऑक्टोंबर रोजी दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत अलोट गर्दी केली होती पाच तास चाललेल्या या कार्यक्रमात महिलांनी दांडिया खेळण्याचा आनंद घेतला या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून असलेली सिने अभिनेत्री प्रार्थना बहिरे ही या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षन ठरली यावेळी उपस्थित असलेल्या महिलांचे आयोजक सौ-ऐश्वर्याताई सोळंके यांनी विशेष आभार मानले

शारदीय नवरात्र उत्सव सुरू आहे या उत्सवानिमित्त जयसिंग सोळंके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कानिफनाथसेवाभावी संस्था यांच्या प्रमुख ऐश्वर्या सोळंके यांच्या वतीने धारूर शहरातील महिलांसाठी दांडिया महोत्सवाचे आयोजन केले होते या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती सिने अभिनेत्री प्रार्थना बहिरे हीची होति कार्यक्रमाची सुरुवात आई आंबाचोंडी देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आली तर आई जगदंबे या गीताने दांडिया कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. या मोहोत्सवामध्ये हजारोच्या संख्येने वेगवेगळ्या वेशभूषेत महिलांनी सहभाग नोंदवला होता. सहभागी झालेल्या महिलांनी दांडिया खेळण्याचा मोठा आनंद या कार्यक्रमात घेतला विशेष महिलांच्या ग्रुपला, बेस्ट ग्रुप, बेस्ट कपल डान्स, बेस्ट सोलो डान्स, बेस्ट स्टॅमिना आधी खेळांना व बेस्ट ड्रेसिंग करून आलेल्या महिलांना विशेष मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले तब्बल पाच तास चाललेल्या या कार्यक्रमात मराठी गीतावर महिला थिरकताना दिसल्या मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या महिलांचे आयोजक ऐश्वर्याताई सोळंके यांनी विशेष आभार मानले.



### दांडिया महोत्सव बक्षिस वितरण

प्रथम ग्रुप साडी, नेकलेस (पी) (8 महिलांचा ग्रुप)
बेस्ट ग्रुप द्वितीय ग्रुप तोरण (8 महिलांचा ग्रुप)
बेस्ट स्टॅमिना प्रमुख आकर्षण प्रार्थना बेहेरे सिनेअभिनेत्री
बेस्ट सोलो डान्सिंग प्रथम पारितोषिक दोन स्टील डबे
द्वितीय पारितोषिक एक स्टील डब्बा
बेस्ट ड्रेसिंग प्रथम पारितोषिक दांडिया ड्रेस ज्वेलरी
द्वितीय पारितोषिक 1 समई सेट
15 ते 30 (वगोगट) छोटी ट्रॉली-लगेज बॅग
30 + (वगोगट) मोठी ट्रॉली-लगेज बॅग
बेस्ट कपल डान्स चौरंग (प्रत्येकी)



माझे पती जयसिंग सोळंके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा माध्यमातुन धारुर शहरात गेल्या दोन वर्षांपासून मी शारदीय नवरात्र उत्सवाच्या शुभ पर्वावर दांडिया महोत्सव आयोजन करत आहे. यावर्षी तिसरे वर्ष आहे. दरवर्षी महिलांची वाढती गर्दी आणि त्याच्याकडून मिळणारा प्रतिसाद आम्हाला प्रेरणादायी ठरतं आहे. विशेष म्हणजे विनामुल्य विवीध स्पर्धा आयोजित करत आहोत. महिला यामध्ये सहभागी होऊन आनंद घेत असल्याचे समाधान वाटते.

**– ऐश्वर्याताई जयसिंग सोळंके.**
**कानिफनाथ बहुउद्देशीय**
**सेवाभावी संस्था धारुर**






# माजलगाव मतदारसंघात प्रकाश दादांचा विकास कामांचा धडाका चालूच

# दर्जेदार विकासकामे ग्रामस्थांनी करून घ्यावेत : आ. प्रकाश सोळंके

**माजलगाव प्रतिनीधी**

हॅम योजनेअंतर्गत सुरडी ते सादोळा या सिमेंट रस्ता कामासाठी ६० कोटी ४० लक्ष रुपये निधी उपलब्ध आहे. त्या कामाचा आज शुभारंभ होत आहे. हा रस्ता दर्जेदार, अंदाजपत्रकानुसार व गुत्तेदाराला सहकार्य करून ग्रामस्थांनी करून घ्यावा. असे आवाहन आ. प्रकाश सोळंके यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर (माळेवाडी) येथे रविवार दि. १३ रोजी दुपारी ११ वाजता हॅम योजनेअंतर्गत सुरडी ते सादोळा या १३ किलोमीटरच्या ६० कोटी ४० लक्ष रुपये सिमेंट रस्ता कामाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुराव पोटभरे होते, तर विशेष उपस्थितीत माजी बांधकाम सभापती जयसिंग सोळंके, संभाजी शेजुळ, डॉ. वसीम मनसबदार, अच्युतराव लाटे, श्रीहरी मोरे, यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून पुढे बोलताना आ. सोळंके म्हणाले की, माजलगाव मतदार संघात हजारो कोटीच्या विकास योजना आम्ही राबवल्या आहेत. शेतकऱ्यांच्या हिताची कामे केली आहेत. पैठण ते माजलगाव कालवा नूतनीकरण. सादोळा ते सांगवी उपसा सिंचन योजना. जलजीवन योजना. यासह विविध महत्त्वकांक्षी योजना याठिकाणी राबविल्या आहेत. लोकांचे आर्थिक जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. सुरडी ते सादोळा रस्त्याच्या या विकास कामामुळे या भागातील दळणवळणाचा मोठा प्रश्न मार्गी लागणार आहे. तब्बल ६० कोटी ४० लाख रुपये निधी या कामासाठी आला आहे. त्यानिमित्त हा उद्घाटन कार्यक्रम आहे. परंतु ह्या रस्त्याचे काम करून घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी जागरूक असणे आवश्यक आहे. हा रस्ता किमान पुढच्या २५ वर्षे टिकला पाहिजे. दर्जेदार झाला पाहिजे यासाठी येथील नागरिकांनी कामाच्या अंदाज पत्रकानुसार काम दर्जेदार होतंय का? यावर लक्ष ठेवले पाहिजे. काम व्यवस्थित होत असेल तर गुत्तेदारालाही सहकार्य केले पाहिजे. असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित ग्रामस्थांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयदत्त नरवडे यांनी केले. सूत्रसंचलन व आभार निंबाळकर यांनी मानले.या कार्यक्रमाला मुरलीधर साळवे, राजेश मेंडके, अजय शिंदे, नवनाथ धायजे, करीम कुरेशी, कोंडीबा लोंढे, सचिन जावळे, बाबानाना आगे, शहाजी कोलते, यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

## प्रकाश दादाच विकासपुरुष

माजलगाव मतदार संघाच्या विकास कामाची मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने कै. सुंदरराव सोळंके यांनी रोवली. याठिकाणी शेतीसाठी पाण्याचे प्रकल्प उभी केल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती आली. त्यांच्याच पावलावर पावले टाकून प्रकाश दादांनी मतदार संघाच्या विकासासाठी अविरत परिश्रम केले. त्यामुळेच मतदार संघातील मतदारांनी दादावर विश्वास टाकून चार वेळा नेतृत्व करण्याची संधी दिली. वास्तविक पाहता एकदा निवडून आलेला आमदार माजलगाव मतदार संघात डबल झाला नाही. कारण निष्क्रिय राहिलेल्या. आमदाला जनतेने संधी दिली नाही.

## दिंद्रुड ते आडस २८ किलोमीटर रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

लोकनेते उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या पासून प्रेरणा घेत माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा विकास हेच सोळंके कुटुंबाचे ध्येय गेल्या ४० वर्षांपासून असल्याचे मत आमदार प्रकाश सोळंके यांनी दिंद्रुड येथे दिंद्रुड ते आडस या २८ किलोमीटर सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ प्रसंगी केले. दिंद्रुड येथील अक्षरा मंगल कार्यालयात रविवारी ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी दिंद्रुड, देवदहिफळ, कांदेवाडी, सुरनरवाडी, सिंगनवाडी, असरडोह येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

## विकासासाठी कटिबद्ध



आजोबा सुंदरराव सोळंके साहेब, चुलते प्रकाश दादा आणी वडील धैर्यशिल काका यांच्या कर्तव्यतत्परतेचा अनुभव माझ्या पाठीशी आहे. सोळंके कुटुंबियांने आता पर्यंत कधीही स्वार्थासाठी राजकारण केले नाही. सदैव जनहिताला प्राधान्य दिले आहे. काम घेऊन येणारा कोणत्या पक्षाचा आहे. यांचा तिळभरही विचार न करता त्यांचे काम मार्गी लावले आहे. आतापर्यंतच्या कामाची शिदोरी आणि भविष्यातही मतदार संघासाठी मी सदैव जनतेसोबत सक्रिय असल्याची ग्वाही.

**- जयसिंग सोळंके**
**युवा नेते माजलगाव मतदारसंघ**

## प्रकाशदादा मुळेच मी दोन वेळेस सभापती



प्रकाश दादांनी अनेकांना विवीध पदावर विराजमान केले. सतत धडपड करणाऱ्या कार्यकर्त्यांना बळ दिले आहे. विकास कामाला प्रथम स्थान दादांनी दीले. मी दोन वेळेस बाजार समितीचा सभापती झालो. ते फक्त आणखी फक्त विकास पुरूष प्रकाश दादामुळेच. झालो अशी भावनाही

**- जयदत्त नरवडे**
**सभापती बाजार समीती माजलगाव**

## आ. सोळंककेंनीच मतदारसंघाचा विकास केला; मी त्यांच्यासोबतच



माजलगाव मतदार संघाचा विकास आ. प्रकाश सोळंके यांनी केला आहे. करोडो रुपयाचा निधी त्यांनी माजलगाव मतदार संघासाठी आणला आहे. माजलगाव, वडवणी, धारुर येथे आरोग्य,पाणी, रस्ते या सह अनेक शासकीय योजना अमलात आणल्या आहेत. भविष्यातही दादांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला मतदार संघाचा विकास करायचा आहे.त्यामुळे मी त्यांच्यासोबत आहे.

**- बाबुराव पोटभरे, बहुजन नेते**

## वडवणी तालुक्यातील देवळा येथील ४ कोटी २० लाखाच्या कामांचा शुभारंभ



वडवणी तालुक्यातील देवळा येथे दि.१३ ऑक्टोंबर २०२४ रोजी माजलगाव मतदार संघाचे विकास भिमुख लोकप्रिय आमदार प्रकाश सोळुके यांच्या हस्ते ४ कोटी २० लक्ष रुपये कामाचा उद्धाटन सोहळा व वीस लाख रुपये कामाचा लोकार्पण सोहळा पार पडला. बऱ्याच दिवसापासून प्रलंबित राज्य महामार्ग २२२ अंतर्गत देवळा येथील ८२० मीटर लांबीचा सिमेंट रस्ता व नाली बांधकाम घाटामधील ३०० मीटर लांबीची संरक्षण भीत व डॉगरी विकास मधून देवळा ग्रामपंचायत अंतर्गत २० लक्ष रुपये सिमेंट रस्ता व देवळा बुद्रुक येथील जि.प. शाळाकडे जाणाऱ्या लेंडी नदीबरील पूल ४० लक्ष रुपये २५/१५ अंतर्गत देवळा व कान्होबाची वाडी येथे १० लक्ष रुपये सिमेंट रस्ता व देवळा बुद्रुक येथील जाधव वस्ती येथे महादेव मंदिर सभागृह व देवळा येथील डॉ.आंबेडकर नगर येथील सिमेंट रस्त्याचा लोकार्पण सोहळा अशा विविध विकास कामा आ. प्रकाश दादांनी करत देवळा गावांत विकासाची गंगा आणली आहे.

- **अर्जुन कदम**,संचालक बाजार समिति वडवणी

## यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेत ४ हजार ६४३ लाभार्थ्यांना मंजुरी

माजलगाव विधानसभा मतदार संघात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेत ४ हजार ६४३ लाभार्थ्यांना मंत्री अतुल सावे यांच्याकडे आ. सोळंके यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे माजलगाव मतदारसंघातील ४ हजार ६४३ लाभार्थ्यांच्या प्रस्तावास दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे. याबद्दल इतर मागास बहुजन कल्याण विभागचे मंत्री ना. अतुल सावे यांचे आभार आ. प्रकाश सोळंके यांनी मानले. दरम्यान विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गरजू नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेतून स्वतःचे पक्के घर बांधण्यासाठी १ लाख वीस हजार रुपयांचा निधी दिला जातो. मतदार संघात मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजूर झाले असल्याचेही आ. सोळंके यांनी सांगितले.

## मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत आ. प्रकाश सोळंके यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप

## वडवणीच्या पुढार्यांनी जिल्हा बुडवण्याचा पायंडा पाडला : जयसिंह सोळंके

**वडवणी प्रतीनीधी:** माजलगाव मतदारसंघातील होतकरू तरुणांना व्यवसाय करण्यासाठीं मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ मुंबई अंतर्गत पात्र लाभार्थी यांना मंजुर झालेले प्रमाण पत्र आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते वडवणी येथील बचत गट भवण येथे वाटप करण्यात आले. यामध्ये झालेल्या पहिल्या यादीची माहिती माजलगाव तालुक्यात बिजनेस लोनसाठी २०० तरूणांना वाटप करण्यात आले. तसेच शैक्षणिक लोन ५० विद्यार्थांना वाटप करण्यात आले. वडवणी तालुका ७० तरूणांना बिझनेस लोन दिले तर धारूर तालुक्यात बिझनेस लोन 20 होतकरू तरूणांना दीले. या साठी मौलाना आझाद विकास महामंडळाचे चेअरमन मुस्ताक अंतुले सर मौलाना आझाद विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब,मौलाना आझाद विकास महामंडळाची बीड जिल्हा व्यवस्थापक सय्यद इमरान कादरी सर यांनी विशेष परिश्रम घेतले. विशेषकरून वेळोवेळी आमदार प्रकाश दादा यांनी सातत्याने पाठपुरवठा केला. यामुळें पात्र लाभार्थी यांना मंजुर झालेले प्रमाण पत्र आ.प्रकाश सोळंके व युवा नेते जयसिंह सोळंके बोलताना म्हणाले की वडवणीच्या पुढार्यांनी जिल्हा बँक बुडवण्याचा पायंडा पाडला मात्र हा समाज इमानदार आहे मेहनती आहे. हे नक्कीच परत फेड करतील याची मला खात्री आहे असे म्हणाले. नंतर वडवणी येथे पत्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रम पुर्वी राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांना श्रद्धांजली वाहन शोक भावना व्यक्त केली. या कार्यक्रम प्रसंगी इम्रान कादरी सर, अखिल सय्यद,शेषेराव जगताप, बजरंग साबळे, संभाजी शिंदे, बन्सीभाऊ मुंडे, सचिन सानप, अस्लम कुरेशी, नागेश डिगे, आबेद भाई चींचवन, गुरुप्रसाद माळवदे, मुस्तकिन शेख, यांच्या सह मान्यवर व मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शेवटीं कार्यक्रमांचे आभार मनन बागवान यांनी मानले.



# आडसकरांच्या हाती तुतारी?

## आता घेवू भरारी; सोशल मिडीयावरील पोस्ट तुफान व्हायरल

**वडवणी प्रतिनीधी**

महाराष्ट्राच्या विधानसभेची निवडणूक तोंडावर आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्याच्या राजकारणात मोठी अदलाबदल होणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत अल्प मतांनी पराजित झालेले रमेश आडसकर महायुतीच्या पेचामुळे हातात तुतारी घेणार असल्याचं संकेत मिळाले आहेत. याच अनुषंगाने आता घेवू भरारी; अशा सोशल मिडीयावरील पोस्ट तुफान व्हायरल होत आहेत.

जिल्ह्याच्या राजकारणात माजलगाव मतदार संघाने नेहमीच प्रभावी भुमिका बजावलेली आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत या मतदार संघाने शरद पवारांच्या तुतारीला खंबीर साथ दिली. या मतदार संघात सोळंके यांचे नेहमीच वर्चस्व राहिले आहे. याच मतदार संघातून सध्या प्रकाश सोळंके हे विद्यमान आमदार आहेत. वास्तविक पाहता प्रकाश सोळंके हे अजित पवार यांच्या सोबत गेल्यामुळे हा मतदार संघ शरद पवारांच्या रडारवर आहे. त्यामुळे शरद पवार या ठिकाणी पुर्वी प्रमाणेच सोळकेंना मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहेत. त्या अनुषंगानेच ते या मतदार संघातून सध्या भाजपमध्ये असलेले रमेश आडसकर यांना उमेदवारी देऊं शकतील. कारण गेल्या गतविधानसभा



निवडणुकीत अल्प मतांनी त्यांना पराभव पत्करावा लागला होता. तरीही सतत जनतेशी नाळ कायम ठेवलेला नेता म्हणून त्यांची ख्याती आहे. माजलगाव मतदारसंघांत इतर काही नेते निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. मात्र या मतदार संघातून शरद पवार साहेब रमेश आडसकाराना आपल्याकडे घेवून उमेदवारी देतील अशी शक्यता आहे. याच अनुषंगाने आडसकर यांच्या काही कार्यकर्त्यांकडूनही साहेबांनी तुतारीवरच निवडणूक लढवावी असा आग्रहही केला जात आहे.

## जनतेच्या टच मध्ये असलेला नेता

गेल्या विधानसभा निवडणुकीत अल्प मतांनी आडसकर यांना पराभव पत्करावा लागला. मात्र त्यांनी पराभवाच्या तिसऱ्या दिवशही शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली होती. आजतागायत ते जनतेच्या सुख दुःखात कायम जणसेवत आहेत. त्यामुळें आडसकर यांनी तुतारीवर माजलगाव मतदार संघातून निवडणूक लढवावी अशी अपेक्षा कार्यकत्यांकडून व्यक्त केली जात आहे. याच अनुषंगाने कार्यकर्त्यांकडून टाकलेली 'आता घेवू भरारी' ही सोशल मिडीयावरील पोस्ट तुफान व्हायरल होत असून या पोस्टची चर्चाही ठिकठिकाणी होत आहे.

# माधव निर्मळ यांच्या गावभेट दौऱ्यास वाढता प्रतिसाद

**धारुर प्रतिनीधीः**

धारूर शहरातील उद्योजक तथा माजी नगराध्यक्ष माधव निर्मळ हे लोकसभा निवडणुकी पासून मतदार संघात सक्रिय झाले आहेत. सध्या गाव भेट दौऱ्या निमित्त माधव निर्मळ मतदार संघाचा दौरा करत आहेत. प्रस्थापित राजकारणास कंटाळलेल्या मतदारांकडून निर्मळ यांच्या बैठकीस प्रतिसाद मिळताना दिसत आहे.



लोकसभा निवडणुकीपासून माजलगाव मतदार संघातील वारे प्रस्थापित विरुद्ध विस्थापित असे वाहताना दिसत आहे. मतदारसंघात सध्या डझनभर भावी आमदार विधानसभेला सामोरे जाण्याच्या तयारीत दिसत आहेत. यात अनेकजण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट घड्याळ चिन्हाकडून लढण्यास उत्सुक आहेत तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तुतारीकडून लढण्यासाठी अनेकजणांच्या शरद पवारांशी गाठीभेटी सुरू आहेत. मतदार संघात सर्वच भावी आमदारांकडून सध्या गाठीभेटी गाव भेट दौरे आयोजित केले जात आहेत. लोकसभा निवडणुकीला पंकजा मुंडे यांच्यासाठी परिश्रम घेणारे धारूरचे उद्योजक तथा माजी नगराध्यक्ष माधव निर्मळ यांनी सुखदुःखात सहभागी होणे गाठीभेटी वाढवलेल्या आहेत.

माजलगाव मतदार संघात यावेळी ओबीसी चेहरा म्हणून माधव निर्मळ यांना चांगला प्रतिसाद मिळताना दिसतोय. विशेष म्हणजे माधव निर्मळ यांच्या गाव भेट दौऱ्या दरम्यान गावा गावातील तरुण माधव निर्मळ यांच्या संपर्कात येत आहेत.



# बाबरी मुंडेंची वडवणी धारूर पाठोपाठ माजलगावातही क्रेज

## तयारी विधानसभेची ; तालुक्यातील 50 गाववस्तीवर झंजावती दौर्याला उत्स्फर्त प्रतिसाद

**माजलगाव प्रतिनिधी:- वडवणी**



तालुक्याच्या राजकारणात समाजकारणात नंबर एकवर बाबरी मुंडे यांचे नाव गनल्या जाते. असा 'युथ आयकॉन' असणारा हा चेहरा येता विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव तालुक्यातही सक्रिय झाला आहे. दरम्यान दोनच आठवड्यात त्यांनी आपली क्रेज याठिकाणी निर्माण केली आहे. तालुक्यात तब्बल ५० गाववस्तीवर त्यांनी आपला संवाद दौरा पूर्ण केला आहे.



या झंजावती दौऱ्यात हजारो तरुणांची साथ भेटत असून गावागावात वस्तीवस्तीवर त्यांना थोडामोठ्यांचा आशीर्वाद, उत्स्फ र्त प्रतिसाद मिळत आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे, आ. पंकजा म डे यांचे निकटवर्ती म्हणून बाबरी मुंडे यांचे नाव आहे. वडवणी तालुक्यातील राजकारणात समाजकारणात त्याचा प्रभाव आहे. जिल्हाभर त्यांची ओळख आहे. युथ आयकॉन म्हणून बाबरी मुंडेनी आपली ओळख तरुणांच्या मनात निर्माण केली आहे. दरम्यान जिल्ह्यात मराठा ओबीसी असा राजकीय बाद टोकावर पोहोचला आहे. अशा स्थितीत माजलगाव विधानसभेत प्रभावी ओबीसी चेहरा असणाऱ्या नेतृत्वाला नशीब आजम ावण्याची संधी आहे. याच पार्श्वभूमीवर ओबीसी प्रभावी चेहरा म्हणून बाबरी मुंडे यांनी माजलगाव विधानसभेत आपले नशीब आजमावण्यास सुरुवात केली आहे. बोलका, हसता खेळता मनमोकळा स्वभाव, येथील तरुणांना फक्त दोनच आठवड्यात लक्षात आला. त्यामुळे शितावरून भाताची परीक्षा झाली असल्याने बाबरी मुंडे यांनी येथे आपली क्रेझ निर्माण केली आहे. हजारो तरुण त्यांना येऊन भेटत आहेत. माजलगाव तालुक्यातील बडेवाडी, नित्रुड, सुलतानपूर, नाकलगाव, पिंपळगाव, दिंद्रूड, रामनगर तांडा, मोठेवाडी, हनुमान नगर, पवारवाडी, कल्याण नगर, सिद्धेश्वर नगर, खरात आडगाव, हनुमान नगर तांडा, निपाणीटाकळी, वसंत तांडा, शुक्लतीर्थलिमगाव, सोन्नाथडी, गुंजथडी, सुरूमगांव, गंगामसला, आडोळा, सरवर आबेगाव, छत्र पिंपळगांव, बोरगाव, सिमरी पारगाव, जीवनापूर नाथनगर तांडा, साळेगाव, देवळा, कोथरूळ, पुरुषोत्तमपुरी, माळेवाडी, महातपुरी, वाघोरा, किट्टीआडगाव, गोविंदवाडी, लऊळ नं.१, पात्रूड, शिंदेवाडी, लहामेवाडी, गुजरवाडी, शेंडगेवस्ती ई.५० गाव वस्ती, वाडी, तांड्यावर आपला संवाद झंजावती दौरा त्यांनी पोहोचवला आहे.या झंजावाती संवाद दौऱ्याला, या तरुण नेतृत्वाला तरुणांची प्रचंड साथ भेटत आहे. थोरामोठ्यांचा आशीर्वाद भेटत आहे.